## संक्षिप्त वृत्त



### श्री रामकृष्ण क्षीरसागर स्वामींचा जन्मोत्सव

**सोलापूर :** श्री रामकृष्ण सेवा सत्संग मंडळ, सोलापूर यांच्यावतीने रामकृष्ण क्षीरसागर स्वामी यांच्या ९१व्या जयंती उत्सवानिमित्त सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून वेदमूर्ती जयंत फडके व वेदमूर्ती गोपाळ जोशी यांनी संबोधन केले. प्रारंभी माजी अध्यक्ष कालिदास जोशी यांच्याकडून शाल, श्रीफळ, पुष्प गुच्छ व दक्षिणा देऊन त्यांचा सत्कार केला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अभय दिवाणजी होते. त्यांचा सत्कार सत्संगाचे अध्यक्ष प्रमोद चोळ्ळचगुद्द यांनी सत्कार केला. याप्रसंगी व्यासपीठावर मोहन दाते, दादा शिरसीकर, प्रसाद जोशी, ऋषिकेश जोशी, शेखर कुलकर्णी, दादेगावकर आदींचा सत्कार झाला. पंढरपूर येथील पाठशाळेतून आलेल्या ८ बटूंचाही मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. जयंत फडके यांनी वेद हे जगातील पहिले वाङ्मय आहे. ते सृष्टीच्या आधी परमेश्वरानेच मानवाच्या कल्याणासाठी निर्माण केले म्हणूनच ते अनादी आहे, असे सांगितले. यावेळी अभय दिवाणजी, मोहन दाते यांनीही संबोधन केले. सुलगुडले यांनी अहवाल सादर केला. जितेंद्र महामुनी व पुष्कराज गोयल यांनी शंखनाद करून उपस्थितांना आनंदित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमेश्वर लवंगे यांनी केले. तर दिलीप बोडके यांनी आभार प्रदर्शन केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.



### भाजपकडून विकासकामांच्या पत्रकांचे सुळेवाडीत वाटप

**वेळापूर :** सुळेवाडी (ता. माळशिरस) गावात भाजपच्यावतीने गाव चलो अभियान राबवण्यात आले. बुथ क्र. २०५ मधील सर्व लोकांना संगठित करून शासनाच्या विविध योजनांविषयी चर्चा करण्यात आली. घरकुल, स्वस्त धान्य दुकान, सोसायटी कर्ज, मतदार यादीत नावे घालणे इत्यादीविषयी सांगण्यात आले. यावेळी मळोलीचे प्रवासी प्रमुख चंद्रकांत जाधव, सुळेवाडीचे नेते दुर्वा सोलंकर, माजी सरपंच कृष्णात सुळे, बुथ अध्यक्ष भानुदास सुळे, सतीश सोलंकर, सुभाष सुळे, जयवंत सुळे, गोरख सुळे, अमोल धडस, ईश्वर सुळे ,सत्यवान दडस, शिवाजी दडस, किशोर सुळे, सतीश सोलंकर, धनाजी बोडरे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### राष्ट्रवादी काँग्रेसच्या सांगोला तालुक्यात स्वराज्य सप्ताह

**सांगोला :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) च्यावतीने राज्यभर दि. १२ ते १९ फेब्रुवारीपर्यंत स्वराज्य सप्ताह राबविला जात आहे. याचाच एक भाग म्हणून जिल्हाध्यक्ष माजी आ. दिपक साळुंखे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने विविध उपक्रम तालुक्यामध्ये राबवले जात आहेत. पारे व सोनंद येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने दि. १२ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास दुग्धाभिषेक, परिसर सुशोभीकरण, स्वच्छता आणि महाराजांना वंदन करून या सप्ताहाची सुरुवात केली. दि. १३ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी संघटनेच्यावतीने राष्ट्रसंत भैय्यू महाराज प्रशालेमध्ये तालुकास्तरीय निबंध स्पर्धा झाल्या. तालुक्यातून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. दि. १४ रोजी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने धायटी येथे तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा झाला. स्पर्धेमध्ये रयतेच राज्य शिवरायांचे या विषयावर स्पर्धा झाल्या. दि.१५ रोजी सांगोला तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने घेरडी येथे संत तुकाराम महाराज गाथा वाटप केले. दि. १६ व १७ फेब्रुवारीला महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने रांगोळी स्पर्धा व शिरभावी येथे ॲड. महादेव कांबळे यांचे 'शिवरायांचे रयतेचे राज्य'या विषयावर शिवव्याख्यान झाले. तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यानिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य घराघरापर्यंत पोहोचवण्याकरता सहभागी झाले आहेत.

# ग्रामपंचायतीत सरपंच'पती'च्या 'उचापती' थांबणार!

## 'यशदा'च्या मास्टर ट्रेनरद्वारे गावच्या 'कारभारणीला' मिळणार 'राज्यकारभाराचे धडे'

**सुराज्य/सोलापूर**

जिल्ह्यातील एक हजार २४ ग्रामपंचायतींपैकी ५१२ गावांच्या कारभाराची धुरा 'ती'च्या हाती आहे. पण, अनेक सरपंच महिलांचे पती कारभारात लुडबूड करीत उचापती करतात. महिला पहिल्यांदाच सरपंच झाल्याने त्यांना कारभाराची फार माहिती नसल्याने असे प्रकार होतात, ही वस्तुस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी सर्वच महिला सरपंचांना राज्यकारभाराचे धडे देण्याचा निर्णय घेतला असून २८ फेब्रुवारीपूर्वी त्या सर्वांची कार्यशाळा होणार आहे.

### कार्यशाळेत 'या'वर होणार प्रशिक्षण

- आरोग्यदायी व बालस्नेही गाव
- लिंग समभाव पोषक गाव (स्त्री-पुरुष समानता)
- महिलांचे अधिकार व कायदे
- गावच्या कारभारातील प्रशासकीय अडचणी
- १५ वा वित्त आयोगाचा निधी, निविदा, विकासकामे करण्याची प्रक्रिया
- घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन, 'जलजीवन'च्या कामाकडे विशेष लक्ष देणे


गावचा कारभार हाकताना सरपंचाचे अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या काय असतात याबद्दल आता महिला सरपंचांना 'यशदा'च्या मास्टर ट्रेनरद्वारे जिल्हा परिषदेतर्फे पहिल्यांदाच प्रशिक्षण दिले जाणार आहे. गावचा विकास करताना सर्वाधिक निधी कसा मिळू शकतो, पंचायत समिती, जिल्हा परिषदेकडून गावासाठी कोणकोणत्या योजना मिळतात, याबद्दलची संपूर्ण माहिती त्या महिला सरपंचांना दिली जाईल. 'स्वच्छ भारत मिशन'मधून गावातील सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन करणे



अपेक्षित आहे. सध्या गावातील प्रत्येक कुटुंबाच्या पिण्याचा पाणीप्रश्न सुटावा म्हणून जलजीवन मिशनमधून घराघरांत नळ कनेक्शन दिले जाणार आहेत. ही योजना गावाचा पाणीप्रश्न विशेषत: महिलांसाठी खूप महत्त्वपूर्ण असल्याने महिला सरपंचांनी त्यात विशेष लक्ष घालावे हाही या प्रशिक्षण तथा कार्यशाळेचा हेतू आहे.

### महिला प्रशिक्षणामुळे होणार गावांचा विकास

जिल्ह्यातील एकूण एक हजार २४ ग्रामपंचातींपैकी तब्बल २६२ ग्रामपंचायतींनी निधी असूनही तो २० ते ५० टक्केच खर्च केला आहे. त्यातील बहुतेक ग्रामपंचायतींचा कारभार महिलांच्याच हाती आहे. त्यामुळे त्या महिला सरपंचांना प्रशिक्षण दिल्यास व त्यांची कार्यशाळा घेतल्यास त्या सर्वच गावांच्या विकासाला हातभार लागेल आणि विकासकामे जलदगतीने होईल हा हेतू आहे.



### सोलापुरात कार्यशाळेचे आयोजन

महिला सरपंचांना प्रशासकीय पातळीवरील विविध बाबींचे मार्गदर्शन व प्रशिक्षण दिल्यास त्याचा लाभ गावच्या विकासासाठी होईल. या हेतूने पुढील आठवड्यात सोलापूर शहरात कार्यशाळा घेण्याचे नियोजन आहे.

**– मनीषा आव्हाळे**, सीईओ

'यशदा'च्या प्रशिक्षकांसह स्वत: मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे या देखील सर्वांना मार्गदर्शन करणार आहेत.

# मराठा समाजाचा आ. शिंदे बंधूंच्या घरासमोर ठिय्या

**सुराज्य/कुर्डूवाडी**

मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी माढा तालुका सकल मराठा समाजाच्यावतीने रविवारी आ. बबनराव शिंदे व आ. संजय शिंदे यांच्या घरासमोर ठिय्या आंदोलन केले. यावेळी आ. बबनराव शिंदे यांनी आश्वासन देत मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्राची प्रत आंदोलकांना दिली.

प्रारंभी कुर्डूवाडीमधील शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण निमगाव (ता. माढा) येथील आमदार बंधूंच्या घरासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. तसेच घोषणाबाजी करण्यात आली.

माढा सकल मराठा समाजाच्यावतीने मागण्यांचे निवेदन आमदारबंधूंना देण्यात आले. यावेळी बंडू ढवळे, सुरेश बागल, बाबासाहेब गवळी, दत्ता काकडे, व्यंकटेश पाटील, अरुण जगताप, मच्छिंद्र कदम, चेतन गोडसे, सचिन जगताप, प्रशांत गिड्डे, प्रमोद बागल, वाहिद शेख, सौदागर जाधव, शहाजी पाटील, अनिल जगदाळे, दीपक पाटील, बाळासाहेब बागल, लक्ष्मण बागल, मधुकर गपाटे, संतोष पवार, अमोल नवले, भीम बंडगर उपस्थित होते.

### एकमुखाने मागणी करणार

'सगेसोयरे' या शब्दाचा आंतरभाव असलेल्या अधिसूचनेचे शासन निर्णयात रूपांतर व्हावे, यामागणीचे पत्र मुख्यमंत्र्यांना दिले आहे. मराठा आरक्षणासाठी काही दिवसात विशेष अधिवेशन होणार आहे. अधिवेशनात याबाबत आ. संजय शिंदे व मी एकमुखाने मागणी करणार आहे.

**– आ. बबनराव शिंदे**

### यासाठी आमचा ठिय्या

मराठा आरक्षण कायद्यात रूपांतर करावे यासाठी अधिवेशनामध्ये आ. बबनराव शिंदे व संजय शिंदे यांनी एकमुखाने ठराव मांडावा यासाठी आम्ही ठिय्या आंदोलन केले. आ. शिदे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेले पत्राची प्रत आम्हाला दिली.

**– संजय टोणपे**, सकल मराठा समन्वयक.



# पुणे विभागीय टार्गेट बॉल स्पर्धेत 'श्राविका' विजयी

**सुराज्य/सोलापूर**

क्रिडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रिडा परिषद सोलापूर यांच्यावतीने जिल्हा क्रिडा संकुल बॅडमिंटन हॉल येथे पुणे विभागीय टार्गेट बॉल स्पर्धा झाल्या. १७ वर्षांखालील गटात उमाबाई श्राविकाच्या संघाने विजय मिळविला.

मुलांचा अंतिम सामना सोलापूर शहर (उमाबाई श्राविका) व सोलापूर ग्रामीण यांच्यात झाला. ४/१ गुणांसह उमाबाई श्राविका संघ विजयी झाला. संघाची यवतमाळ येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. संघात कर्णधार उज्वल इंडे, तपन दास, आदित्य होनपारखे, कृष्णा गजेली, नितीन इंदापुरे, प्रतिक बंडगर, आदित्य मुळकुटकर, ओम पवार, स्वरूप सांबेरकर, कृष्णा दराडे, श्रवण मकरिये, संभाजी शिंदे यांचा समावेश होता.

या यशाबद्दल श्राविका संस्थेचे सचिव हर्षवर्धन शहा, विश्वस्त अंजली शहा, डॉ. रोहिणी शहा, सीईओ दुवई शहा, वरिष्ठ दिप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका आश्विनी पंडित, बाळासाहेब पौळ आदींनी अभिनंदन केले. खेळाडूंना क्रिडाशिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सोशल नेटवर्किंगमुळे मुली परधर्मीयांच्या जाळ्यात अडकतात : डॉ. शेटे

**सुराज्य/सोलापूर**

मोबाईलमध्ये मुली काय करतात हे आईवडिलांनी पाहिले पाहिजे. मुलींच्या एका चुकीच्या निर्णयाने परिवाराला मोठा धक्का बसतो. सोशल नेटवर्किंगमुळे शहरात रेकॉर्डवर दीड हजार मुली गायब असल्याचे वास्तव आहे, असे शिवव्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांनी सांगितले.

जय भवानी शिव जन्मोत्सव मंडळाच्या ४९ व्या पदार्पण निमित्त घोंगडे वस्ती येथे चला संस्कार घडवू या विषयावर डॉ. शिवरत्न शेटे यांचे व्याख्यान झाले यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे डॉ. शिवरत्न शेटे यांच्या हस्ते श्री छत्रपति महाराजांच्या मूर्तीचे पूजन झाले. यावेळी आ. विजयकुमार देशमुख, माजी नगरसेविका अंबिका पाटील, संजय कोळी, राजकुमार पाटील, महेश कोलकर, देविदास चेळेकर, प्रसाद कुलकर्णी, बसवराज भाईकट्टी, दशरथ गंजेळी, महाळप्पा करली, प्रकाश ढंगे, विजय कटके यांच्या प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रसंगी राजकुमार पाटील यांनी केले. संत तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रात जन्म घेऊन त्यांची ख्याती देश विदेशात जाऊन पोहचली आहे.१२ व्या शतकात दुष्काळावर मात करण्यासाठी



सिद्धेश्वर महाराजांनी ४०० जणांना प्रथम सोलापुरात तलाव खोदला. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात वृत्तपत्र, टीव्ही, मोबाईल व सोशल मीडिया नसताना त्यांनी अनेक राज्य जिंकले आहे. शत्रूला मात करण्यासाठी फक्त एका बातमीच्या आधारे महाराजानी अनेकांना सळो की पळो करून लावले आहे. असे शेटे म्हणाले. यावेळी अध्यक्ष राहुल कोळी, मल्लिनाथ उप्पीन, सिद्दु भाईकट्टी, विजय पुजारी, शशी अन्नलदास, दत्ता बडगू, सुमनताई बिल्ला, कविता कोंडा, अनिता येमुल, सपना अवधूत, शिवा हक्के यांच्यासह शशांक भाईकट्टी, अजय कोळी, गणेश कामुर्ती, रोहित तेगेली, सुदीप मेटी, चंदू कोळी, जिंदा गंजेळी, प्रकाश पाटील, सुमित कलबुर्गी, गणेश नडगड्डी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश सावंतगिरी, राजू करली, शिवकुमार पुजारी, अभिषेक पाटील, आकाश पाटील, प्रकाश सुरवसे आदींनी परिश्रम घेतले.

# बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पणजीत पहिले मराठी साहित्य संमेलन

## तरंगते कवीसंमेलनात पद्माकर कुलकर्णी, प्रकाश क्षीरसागर यांचा समावेश

**सुराज्य/सोलापूर**

दिल्ली येथील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्यावतीने २४ व २५ फेब्रुवारी रोजी पणजीत पहिले मराठी साहित्य संमेलन होणार आहे. अधिवेशनात सोलापुरातील पद्माकर कुलकर्णी, प्रकाश क्षीरसागर यांचा तरंगते कवीसंमेलनात सहभाग आहे.

साहित्यकार किरण पुरंदरे हे संमेलनाध्यक्ष आहेत. २४ फेब्रुवारी रोजी संमेलनाचे उद्घाटन सकाळी १०-३० वाजता मराठी भाषामंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते होणार



आहे. माजी केंद्रीयमंत्री रमाकांत खलप, विद्या देवधर आणि प्रशांत पोळ यांची प्रमुख उपस्थिती राहील.

संमेलनात व्याख्यान, परिसंवाद, साहित्यिकांची मुलाखत आदी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. २५ फेब्रुवारीला माधव सटवानी यांच्या अध्यक्षतेखाली तरंगते कवी संमेलन समुद्रात क्रूझमध्ये होणार असल्याचे बृहनमहाराष्ट्र नवी दिल्लीचे अध्यक्ष मिलिंद महाजन आणि प्रधान कार्यवाह दिलीप कुंभोजकर यांनी सांगितले. यात सोलापूरचे पद्माकर कुलकर्णी, कुर्डूवाडीचे प्रकाश क्षीरसागर यांच्यासह अलकनंदा साने, प्रो. पौर्णिमा केरकर, सुषमा वडाळकर, आभा निवसरकर, बसवेश्वर चेणगे, अनिल निगुडकर, कपूर वासनिक, दशरथ परब, राधिका गोडबोले, प्रा विवेक सावरीकर, असावरी कुळकर्णी, अपूर्वा ग्रामोपाध्ये, बसंत शाहपूरकर आदींचा सहभाग राहील.

# ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्यातील दोघांना जामीन

**विरवडे बु :** खंडोबाचीवाडी (ता.मोहोळ) येथील संदीप शिंदे व धनाजी नरके यांनी जातीवाचक शिवीगाळ करुन मारहाण केल्याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायाधीश आय. ए. शेख यांनी आरोपींचा जामीन मंजुर केला. यावेळी न्यायालयाने १ लाख रुपय जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. आरोपीतर्फे ॲड. किरण सराटे तर सरकारतर्फे ॲड. गंगाधर रामपुरे यांनी काम पाहिले.

# स्त्रियांनी जिजाऊ, सावित्री, रमाई यांचा आदर्श ठेवावा

## मोनिका काळे यांचे प्रतिपादन

**सुराज्य/सोलापूर**

संत नामदेव महाराज संत तुकाराम महाराज यांच्या प्रेरणेतून छत्रपती बाल शिवबा तयार झाले. ही अभिमानाची गोष्ट आहे. संस्कार आणि विचार या दोन तत्त्वांचा विचार करावा लागतो. स्वराज्य व्हावे ही श्री ची इच्छा नव्हती तर एका स्त्रीची इच्छा होती. ती स्त्री म्हणजे माँ जिजाऊ त्यांनी स्वराज्याचे मुर्तमेढ रोवली. त्यामुळे स्त्रियांनी जिजाऊ, सावित्री, रमाई यांचा आदर्श ठेवावा असे मत मोनिका काळे यांनी व्यक्त केले.



मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी प्रशालेत आयोजित शिवजन्मोत्सव व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफताना मोनिका काळे बोलत होत्या. आजच्या मुलांना चांगली पुस्तके वाचायला द्यावीत की जेणेकरून त्यातून पुरोगामी विचारांची मूर्तमेढ रोवली जाईल. आजच्या तरुणांनी शिवरायांचे चरित्र भारताचे संविधान वाचले पाहिजे. व्याख्यानाच्या माध्यमातून विचारांचे रोपटे लावणे म्हणजे विचार हे काना असून ते मनापर्यंत पोहोचले पाहिजे. १८ पगड जातीला एकत्र आणण्याचे काम भगव्या झेंड्यांनी केले म्हणजेच छत्रपती शिवरायांनी केले. सर्वांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारे राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज असल्याचे काळे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपाध्यक्ष विनायकराव पाटील यांनी केले. यावेळी प्रा महेश माने,ज्ञानेश्वर सपाटे ,नामदेव थोरात, सुनिता साळुंखे, महादेव गवळी, शिवदास चटके,अशोक चव्हाण,नीलकंठ वाघचवरे, रेखा सपाटे, सुजाता जुगदार, जयश्री साठे, प्रियंका सपाटे, मधुकर पवार, श्रीपतराव जगदाळे, राणी मोटे, अरुण मित्रगोत्री, आणि विद्यार्थी पालक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सोलापुरातून रामभक्त आस्था एक्सप्रेसने अयोध्याला रवाना

## राम भक्तांना अयोध्याला पाठवून भाजपाची राजकीय बांधणी

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर शहर जिल्ह्यातील १ हजार ३४५ राम भक्त शनिवारी दिनांक १७ रोजी सायंकाळी ७ वाजता आस्था एक्सप्रेसने अयोध्याकडे रवाना झाले आहेत. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, मध्य रेल्वेचे अप्पर विभागीय व्यवस्थापक शैलेशसिहं परिहार,जिल्हा सर चिटणीस मनिष देशमुख, मिलन कल्याणशेट्टी यांनी रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला.आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राम भक्तांना अयोध्याला पाठवून भाजपा राजकीय बांधणी करत आहे अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील आणि ६ विधानसभा मतदारसंघातून राम भक्त अयोध्येसाठी रवाना झाले असून,राम भक्तांमध्ये मोठा उत्साह



दिसला. यावेळी कार्यकर्त्यांनी जय श्रीराम, राम लल्ला की जय अश्या घोषणा दिल्या.रामभक्तांच्या उत्साहाला आलेले प्रचंड उधाण अपूर्व होते.

भगवे झेंडे, भगवे शेले, टोपी अन रामनामाच्या घोषणानी आसमंत दुमदुमून गेला. गुलाल, राममाळा, फुलपाकळ्यांनी उत्साहात आणखीनच भर पडली.संयोजकांच्या वतीने राम भक्तांना अयोध्यामध्ये राहण्याची, जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. १९९२ साली अयोध्याला सोलापुरातून कार सेवेसाठी अनेक कार्यकर्ते गेले होते. त्यावेळी केलेल्या सेवेचे फळ प्रथमच अयोध्यामध्ये राम लल्लाच्या दर्शनाने भेटणार आहे असे मत कार सेवकांनी यावेळी मत व्यक्त केले.

मध्य रेल्वे सोलापूर विभागाच्या वतीने अतिरिक्त विभागीय व्यवस्थापक शैलेशसिहं परिहार यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी भाजयुमो प्रदेश सचिव अक्षय अंजिखाने, भाजप जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे,महेश देवकर,सुशील क्षीरसागर,राजकुमार झिंगाडे, डोंगरेश चाबुकस्वार, श्रीशैल हिरेपठ, रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष राजाभाऊ जाधव यांच्यासह असंख्य कार्यकर्ते राम भक्तांना निरोप देण्यासाठी उभे होते.